कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

टोल फ्री क्रमांक - 1064

कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

:: प्रेस नोट :: दिनांक :- 01.03.2021.

**कृषी पंपाचे कोटेशन मंजुर करुन देण्यासाठी महावितरण, उपकेंद्र तिर्थपुरी जि.जालना येथील वरीष्ठ तंत्रज्ञ श्री. राजु नारायण घाडगे यास 11,000/- रुपयांची लाच घेतांना लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक श्री. राजु नारायण घाडगे वय 35 वर्ष व्यवसाय नोकरी वरीष्ठ तंत्रज्ञ महावितरण, शाखा तिर्थपुरी, जि. जालना रा. मारुती मंदीराजवळ तिर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना |
| 2 | गुन्हा घ ता व ठि | :- | दि- 01.03.2021 रोजी महावितरण कार्यालय,शाखा तिर्थपुरी, जि. जालना येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 11,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांची मौजे भायगव्हाण ता. घनसावंगी येथे शेती असुन त्यांना जायकवाडी कॅनॉल येथुन शेतीसाठी पाणी आवश्यक असल्याने त्यांनी व इतर 3 शेतकरी यांनी कृषी पंपासाठी विदयुत पॉवरची आवश्यकता असल्याने कृषी पंपासाठीचे कोटेशन भरुन महावितरण, शाखा तिर्थपुरी येथे अर्ज दिला होता, सदर तक्रारदार यांना व इतर 3 शेतकरी यांना कृषी पंप जोडणीचे कोटेशन मंजुर करुन देण्यासाठी महावितरण, शाखा तिर्थपुरी येथील वरीष्ठ तंत्रज्ञ श्री. राजु नारायण घाडगे यांनी कोटेशनच्या रक्कमे व्यतिरिक्त स्वत:साठी 5,000/- रुपये व इतरांसाठी 14,000/- रुपये अशी एकुण 19,000/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदारास वरीष्ठ तंत्रज्ञ श्री. राजु नारायण घाडगे यांना व त्यांचे सहकारी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन दि. 24.02.2021 रोजी पडताळणी केली असता वरीष्ठ तंत्रज्ञ श्री. राजु नारायण घाडगे यांनी तक्रारदार यांचे व त्यांचे सोबतचे इतर 3 शेतकरी यांचे जायकवाडी कॅनॉल वरुन विदयुत पंपासाठी कनेक्शन जोडणी कोटेशन मंजुर करुन देण्यासाठी स्वत:चे 5,000/- रुपये व इतरांसाठी 14,000/- रुपये अशी एकुण 19,000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले. तसेच आज दि. 01.03.2021 रोजी आलोसे वरीष्ठ तंत्रज्ञ श्री. राजु नारायण घाडगे यांनी तक्रारदार यांचेकडुन विदयुत पंपाचे कोटेशन मंजुर करुन देण्यासाठी 11,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्विकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने महावितरण कार्यालय, उपकेंद्र तिर्थपुरी जि जालना येथे रंगेहाथ पकडले.

लोकसेवक श्री. राजु नारायण घाडगे वय 40 वर्ष व्यवसाय नोकरी वरीष्ठ तंत्रज्ञ महावितरण, उपकेंद्र तिर्थपुरी, जि. जालना रा. मारुती मंदीराजवळ तिर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना (वर्ग - 3 ) यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक
विभाग,जालना.